# इस्लामी तत्वज्ञान व शासनासंबंधी भूमिका

**डॉ. ढोले चंद्रशेखर शंकरराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

प्रस्तुत शोधनिबंध इस्लामी तत्त्वज्ञान व शासनासंबंधीची

भूमिका या शोधनिबंधज इ. स. पाच 5 पाच मध्ये महम्मद पैगंबरांनी परंपरा, रूढीच्या व आत्मसात्काराच्या सहाय्याने लोकांना आरेस दिले. कंट तेच इस्लामी काय रे झाले. पैगंबरांनी अरब मुस्लिम समूह यासाठी हे कायदे कठोरपणे लागू करण्यासाठी काही आज्ञा दिल्या त्या आजपर्यंत पाळल्या जात आहेत.

इस्लामी तत्त्वज्ञानानुसार शासन कसे चालावे याबद्दल कुराणात दोन सुरा आहेत "कारभाराबाबतीत आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करा " (३.१५९) " प्रेषिताच्या सहकाऱ्यांची कारभाराची पद्धत परस्परांत चर्चा करण्याची होती. (४२-३८) या दोन सुरांनी सरकारसंबंधी सिद्धान्त सर्व काळासाठी नमूद करून ठेवला आहे. सरकारसंबंधी कुराणात स्पष्ट निर्णय सापडला नाही तर मुसलमानांना इस्लामी इतिहास व परंपरा यांच्याकडे वळावे लागते व त्यातील पूर्वनिर्णयांच्या आधारे सद्य-परिस्थितीत निर्णय घ्यावा लागतो. प्रथा, परंपरा व पूर्वनिर्णय इस्लामी इतिहासात भरपूर आहेत. "परमेश्वराचा दूत म्हणाला: माझ्यानंतर जे राजयहावर येतील त्यांच्या आज्ञेत राहा. जर ते धार्मिक असतील आणि तुमच्यावर राज्य व्यवस्थित करतील तर त्यांना बक्षीस मिळेल; जर त्यांनी अन्याय केला आणि धर्मानुसार राज्य केले नाही तर त्यांना शासन होईल, तुमची त्यातून सुटका होईल." याचा अर्थ राज्यकर्त्यांच्या आदेश पाळण्याचे बंधन प्रजेवर आले, राजाला शासन करण्याचे काम परमेश्वराचे आहे. मूळ समानतेशी समतेच्या संकल्पनेशी विसंगत आहे. पैगंबरांच्या काळात ते सर्वाधिकारी होते. कारण त्यांना परमेश्वरच खुद्द मार्गदर्शन करत होता. पैगंबरांनी आपल्यानंतर कोण मुख्य व्हावे ते स्पष्ट नमूद करून ठेवले नव्हते. पण त्यांची मुलगी, जावई वगैरे मंडळी होती. अगदी जवळचे अनुयायीही होते. आपल्या नंतर कोणाला अधिकार मिळावेत ते स्पष्ट न करता, तो प्रश्न नातेवाईक व अनुयायांबर सोपविण्याची ही पद्धत आज पनही चालू आहे. त्याचे बरेवाईट परिणाम आपण पाहतोच आहोत.

## १) राजकीय विचाराची पार्श्वभुमी

पैगंबरांचा परमेश्वराशी प्रत्यक्ष संबंध होता व परमेश्वराच्या साक्षात्कारानुसार वेळोवेळी त्याच्या इच्छेनुसारच ते राज्यकारभार चालवीत होते. पण नंतर हा परमेश्वरी संबंध संपल्यावर खलीफांनी काय करावे, तत्कालीन परिस्थितीनुसार लढाया, आक्रमणे, राज्यविस्तार, राज्यकारभार यामुळे राज्यकर्त्याचा अधिकार वाढणे अपरिहार्य होते.

## २) इस्लामिक कायदा

मुसलमानांतील जीर्णमताभिमान हा प्रामुख्याने मुस्लिम कायद्याचा परिपाक आहे. मदिना व नंतर मक्केमधून पैगंबरांनी न्यायाधीशासारखे राज्य चालविले. कधी स्थानिक प्रचलित कायद्यानुसार निर्णय दिले तर कधी साक्षात्कारानुसार. या सर्वांचा संग्रह मुस्लिम कायद्याचा आधार समजला जातो. या निर्णयात प्रार्थना, जकात, विवाह, वारसा, मद्यपान, उपवास, यात्रा, व्यावसायिक व्यवहार, धर्म युद्ध (जेहाद), शिकार, शर्यती, शपथा, गुलामी अशा अनेकविध प्रकारच्या प्रश्नांसंबंधी निर्णय आहेत. त्यांतही त्यांची मांडणी विषयवार नाही. परिणामतः एक विशाल पण अव्यवस्थित रचना असलेला कायदा निर्माण झाला.

या कायद्यात व्यक्तिगत व सार्वजनिक, दिवाणी, फौजदारी असा फरक करून भाग पाडलेले आढळत नाहीत. दातकोरण्याचा वापर व उपयोगापासून विवाहाची आमंत्रणे कधी नाकारावीत, धार्मिक भोजनप्रसंगी काय काय असावे, कुटुंबातील बारीक-सारीक संबंध असे अगदी क्षुल्लक वाटणारे प्रश्नही त्यात निर्णयासह नमूद आहेत. मॅकडोनल्ड या

नावाचा लेखक लिहितो की, "एका श्रेष्ठ कायदेपंडिताने कलिंगड कधी खाल्ले नाही; कारण त्याची खाण्याची पद्धत व उपयोग पवित्र कायद्यात नमूद केलेला नाही."

**३) धार्मीक राज्यकारभाराची कल्पना**

खिलपतीची मूळ पैगंबरांची कल्पना धर्मराज्याची (Theocracy) होती. ती राजेशाही वा पुरोहितशाहीहून भिन्न होती. रोममधील प्राचीन धर्मराज्याशी वेगळ्या परिस्थितीत तिची तुलना झाली असती. अशी मुस्लिम कायद्यानुसार धर्मराज्य असणारी खिलाफत कधी अस्तित्वात आलीच नाही, पैगंबरांच्या मृत्यूनंतर मोठ्या राज्याच्या मध्ययुगीन मुस्लिम राजकीय विचार व्यावहारिक गरजा व अरबांना शिस्तीत ठेवण्याची आवश्यकता यामुळे उमय्याद खिलाफत ही व्यक्तिगत हुकूमत बनली आणि अब्बासिद खिलाफत पर्शियन धर्तीवर राजेशाही झाली. त्यांना धर्माचा आधार घेणे भागच होते, पण ज्याला पैगंबरांनी आदर्श मानले तसे ते धर्मराज्य नव्हते. कारण त्यात राज्यकतर्त्यांची अरेरावी, हिंसा आणि कारभारातील गोंधळ भरपूर प्रमाणात होता.

खिलाफतीच्या प्रारंभीच्या काळात पर्शिया, स्पेन, सिरिया, इजिप्त या प्रदेशात मुस्लिम असहिष्णुता आणि ख्रिश्चन असहिष्णुता यांची गाठ पडली. मुस्लिम साम्राज्य वाढीचा उद्देश धर्मान्तर हा नव्हता आणि ख्रिश्चनांचा धर्मान्तर हा प्रमुख उद्देश होता. खिलाफतींनी जिंकलेल्या प्रदेशात मुस्लिमेतर नागरिकांना कर द्यावा लागत अवे, त्यांच्या जमिनी व त्यांचा धर्म यात हस्तक्षेप होत नसे. मोठ्या प्रमाणात धर्मान्तर करून कर बुडविणे परवडण्यासारखे नव्हते. त्यापेक्षा मुस्लिमेतरांकडून कर घ्यावेत व शेवटी त्यांचे ते नरकात जळतीलच असे समजून त्यांच्याबद्दल उदासीन राहणे बरे असे धोरण होते. अरब मुस्लिमांनी आपल्यावर कठोर धार्मिक निर्बंध लादून घेतले; पण त्याची सक्ती इतरांवर सहसा केली नाही.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंध इस्लामी तत्त्वज्ञान व शासनासंबंधी भूमिका या शोधनिबंधाच्या शोधकर त्यांनी काही निष्कर्ष मांडले आहेत ते पुढीलप्रमाणे

१) मुस्लिम कायदा इतिहास व परंपरेवर आधारित आहे.
२) पैगंबराचा आदेश म्हणजे कायदा होता.
३) पैगंबर ईश्वरी साक्षात्कारानुसार राज्यकारभार करायचे.
४) स्थानिक व प्रचलित परम व रागत कायद्यानुसार न्यायनिवाडा.
५) लोकांना शिस्तीत ठेवण्यासाठी कडक इस्लामी कायदा.

अशा पद्धतीने या शोध निबंधात निष्कर्ष मांडून मुस्लिम कायद्याच्या बाबतीतची मांडणी पैगंबराचा आदेश रूढी परंपरा यानुसार त्याकाळी राज्यकारभार केला जात होता.

**संदर्भग्रंथ :-**

1) डोळे ना. य., प्रमुख पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद 1999
2) प्रदीप आढे, पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद 2016
3) स. मा. गर्गे, राज्यशास्त्र विकास प्लेटो, ऑरीस्टॉटल, गांधी रॉय राजकीय विचार, के सागर पब्लिकेशन पुणे